ePaper
तीन वर्षांत माओवाद संपवू; मुख्यमंत्री फडणवीसांची ग्वाही!
॥ वर्ष - 8 । अंक -163 ॥ UDYAM-MH-26-0158827॥



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com रविवार, दिनांक 22 डिसेंबर 2024 पुणे आवृत्ती mahaenews.com maha_enews Mahaenews

## आतील पानांत


- पाकिस्तान क्रिकेट बोर्डात गोंधळ!
- पृथ्वीच स्वत:चा सर्वांत मोठा शत्रू!
- माझ्यावरील दंड बीसीसीआयने भरावा
- ख्रिसमस मार्केटवर प्राणघातक हल्ला


## महायुती सरकारचे खातेवाटप अखेर जाहीर

# देवेंद्र फडणवीस पुन्हा गृहमंत्री!

### एकनाथ शिंदेंना गृहनिर्माण; अजित पवारांना

।मुंबई ।महाईन्यूज

**महायुती सरकारमधील नव्या मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर झाले आहे. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गृहखाते आपल्याकडे राखले आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना गृहनिर्माण, नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम खातं मिळालं आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवारांना अर्थ आणि राज्य उत्पादन शुल्क राहणार आहे. राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. त्यानंतर 5 डिसेंबर रोजी नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला.**

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र शपथविधीनंतर देखील मंत्रिमंडळाचा विस्तार रखडला होता, त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं. दरम्यान हिवाळी अधिवेशनाच्या एक दिवस आधीच मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. अधिवेशन सुरू असताना मंत्र्यांना खाते वाटप होईल अशी अपेक्षा होती. मात्र अखेर आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी खाते वाटप जाहीर करण्यात आलं आहे. संपूर्ण राज्याचे लक्ष वेधलले महायुती सरकारचे बहुचर्चित खातेवाटप अखेर आज (दि.२१) जाहीर झाले. गृह खाते हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच राहाणार आहे. तसेच ऊर्जा खात्याची जबाबदारीही त्यांच्याकडेच सोपवली गेली आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पूर्वीचेच अर्थ खात्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी झाली. निकालानंतर ५ डिसेंबरला मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांनी तर उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी शपथ घेतली. यानंतर १५ डिसेंबरला मंत्रीमंडळाचा विस्तार झाला होता.

## राज्यमंत्री :

राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. त्यानंतर 5 डिसेंबर रोजी नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र शपथविधीनंतर देखील मंत्रिमंडळाचा विस्तार रखडला होता, त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं. दरम्यान हिवाळी अधिवेशनाच्या एक दिवस आधीच मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. अधिवेशन सुरू असताना मंत्र्यांना खाते वाटप होईल अशी अपेक्षा होती. मात्र अखेर आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी खाते वाटप जाहीर करण्यात आलं आहे. अपेक्षेनुसार गृहमंत्रालय हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच देण्यात आलं आहे. तर अजित पवार यांच्याकडे पुन्हा एकदा अर्थ मंत्रायलयाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे नगर विकास आणि गृह निर्माण खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## राज्यमंत्री :

**माधुरी मिसाळ** – सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय, वैद्यकीय शिक्षण
**आशिष जयस्वाल** – अर्थ आणि नियोजन, विधी व न्याय
**मेघना बोर्डीकर** – सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा
**इंद्रनील नाईक** – उच्च आणि तंत्र शिक्षण , आदिवासी विकास आणि पर्यटन
**योगेश कदम** – गृहराज्य शहर
**पंकज भोयर** – गृहनिर्माण

## कोणाला कोणतं खातं?

**देवेंद्र फडणवीस** – गृह
**अजित पवार** – अर्थ
**एकनाथ शिंदे** – नगर विकास, गृह निर्माण
**चंद्रशेखर बावनकुळे** – महसूल
**हसन मुश्रीफ** – वैद्यकिय शिक्षण
**चंद्रकांत पाटील** – उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कामकाजमंत्री
**गणेश नाईक** – वन मंत्री
**राधाकृष्ण विखे पाटील** – जलसंपदा
**पंकजा मुंडे** – पर्यावरण व वातावरण बदल, पशुसंवर्धन
**उदय सामंत** – उद्योग व मराठी भाषा
**गुलाबराव पाटील** – पाणी पुरवठा
**दादा भुसे** – शालेय शिक्षण
**गिरीश महाजन** – जलसंधारण (विदर्भ, तापी, कोकण विकास), आपत्ती व्यवस्थापन
**संजय राठोड** – मृद व जलसंधारण
**धनंजय मुंडे** – अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण
**मंगल प्रभात लोढा** – कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन
**जयकुमार रावल** – विपणन, शिष्टाचार
**अतुल सावे** – ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय, ऊर्जा नुतनीकरण
**अशोक उईके** – आदिवासी विकास मंत्रालय
**आशिष शेलार** – माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक
**शंभुराज देसाई** – पर्यटन, खाण व स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय
**माणिकराव कोकाटे** – कृषी
**दत्तात्रय भरणे** – क्रीडा व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय
**जयकुमार गोरे** – ग्रामविकास, पंचायत राज
**नरहरी झिरवाळ** – अन्न व औषध प्रशासन
**संजय सावकारे** – कापड
**संजय शिरसाट** – सामाजिक न्याय
**प्रताप सरनाईक** – वाहतूक
**भरत गोगावले** – रोजगार हमी,फलोत्पादन
**मकरंद पाटील** – मदत व पुनर्वसन
**नितेश राणे** – मत्स्य आणि बंदरे
**आकाश फुंडकर** – कामगार
**बाबासाहेब पाटील** – सहकार
**प्रकाश आबिटकर** – सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण

# सर्वंकष स्वच्छता मोहीम स्पर्धा!

## पालिकेला कधीही आपला क्रमांक पटकाविता आलेला नाही

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानाची तयारी करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. याचा एक भाग म्हणून परिमंडळनिहाय सर्वंकष स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. तसेच, शहरातील विविध भागांत असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची रंगरंगोटी केली जात असून, स्पर्धा देखील घेतली जाणार आहे.**




स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या स्पर्धेत पुणे महानगरपालिकेने यापूर्वी अनेकदा भाग घेतला आहे. मात्र, पहिल्या पाच क्रमांकामध्ये महापालिकेला कधीही आपला क्रमांक पटकाविता आलेला नाही. या स्पर्धेतील क्रमवारी सुधारावी, यासाठी महापालिकेकडून प्रयत्न केले जात आहेत.याचाच एक भाग म्हणून शहरातील स्वच्छतागृहांची स्पर्धा आयोजिण्यात आली आहे. 'पुणे महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण शहरात ११८३ सार्वजनिक स्वच्छतागृहे आहेत. या स्वच्छतागृहांना सध्या 'ऑफ व्हाइट' (बदामी) तसेच हिरवा रंग दिला जात आहे. तसेच, स्वच्छतागृहांची तपासणी करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या पातळीवर समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती स्वच्छतागृहांची पाहणी करून स्वच्छतागृहांना गुण देणार आहे,' असे महापालिका घनकचरा विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी सांगितले. केंद्र सरकारची स्वच्छतेची स्पर्धा जिंकायची असेल, तर महापालिका प्रशासनाला प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाने परिमंडळनिहाय स्वच्छता मोहीम राबवून स्पर्धा घेण्याचे नियोजन केले आहे. पुणे शहरात पाच परिमंडळे आहेत. त्या सर्वांमध्ये ही स्पर्धा घेतली जाणार आहे. या स्पर्धेचा फायदा स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेसाठी होणार आहे, असेही उपायुक्त कदम यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या स्वच्छ अभियान स्पर्धेत पहिल्या पाच क्रमांकामध्ये पुणे शहराचे नाव यावे, यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. मागील वर्षीच्या स्पर्धेत पुणे शहराला दहाव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. यावर्षी पहिल्या पाच क्रमांकात स्थान मिळविण्याचा प्रयत्न राहणार आहे, असे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी सांगितले. या स्वच्छतागृहांना सध्या 'ऑफ व्हाइट' (बदामी) तसेच हिरवा रंग दिला जात आहे. तसेच, स्वच्छतागृहांची तपासणी करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या पातळीवर समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती स्वच्छतागृहांची पाहणी करून स्वच्छतागृहांना गुण देणार आहे,' असे महापालिका घनकचरा विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी सांगितले. केंद्र सरकारची स्वच्छतेची स्पर्धा जिंकायची असेल, तर महापालिका प्रशासनाला प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाने परिमंडळनिहाय स्वच्छता मोहीम राबवून स्पर्धा घेण्याचे नियोजन केले आहे. पुणे शहरात पाच परिमंडळे आहेत. त्या सर्वांमध्ये ही स्पर्धा घेतली जाणार आहे. या स्पर्धेचा फायदा स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेसाठी होणार आहे.

### स्वच्छतागृहांना गुण देणार

पहिल्या पाच क्रमांकामध्ये महापालिकेला कधीही आपला क्रमांक पटकाविता आलेला नाही. या स्पर्धेतील क्रमवारी सुधारावी, यासाठी महापालिकेकडून प्रयत्न केले जात आहेत.याचाच एक भाग म्हणून शहरातील स्वच्छतागृहांची स्पर्धा आयोजिण्यात आली आहे. 'पुणे महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण शहरात ११८३ सार्वजनिक स्वच्छतागृहे आहेत. या स्वच्छतागृहांना सध्या 'ऑफ व्हाइट' (बदामी) तसेच हिरवा रंग दिला जात आहे. तसेच, स्वच्छतागृहांची तपासणी करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या पातळीवर समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती स्वच्छतागृहांची पाहणी करून स्वच्छतागृहांना गुण देणार आहे.

# भटके श्वान पकडल्याचा पालिकेचा दावा

## भटक्या श्वानांच्या हल्ल्यानंतर महापालिकेने उचलले पाऊल!

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आंबेगाव पठार येथे एका लहान मुलावर भटक्या श्वानांनी हल्ला चढवून जबर जखमी केले. शहरात भटक्या श्वानांचा त्रास दिवसेंदिवस वाढतच असून, भटके श्वान चावल्याच्या दरमहा सरासरी दोन हजार घटना घडत आहेत. भटक्या श्वानांच्या प्रश्नाकडे महापालिका प्रशासनाने गांभीर्याने पाहावे, अशी नागरिकांची मागणी आहे.**

आंबेगाव पठार येथे शुक्रवारी सकाळी पार्किंगमध्ये खेळत असलेल्या एका लहान मुलावर दोन ते तीन भटक्या श्वानांनी हल्ला केला. भारती विद्यापीठाच्या मागे असलेल्या चंद्रांगण सोसायटीमध्ये हा प्रकार घडला. हल्ल्यात जखमी झालेल्या मुलावर भारती विद्यापीठ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महापालिकेने या घटनेची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही सुरू केली असल्याची माहिती आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. लहान मुलावर श्वानाने केलेल्या हल्ल्याच्या या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी खासगी डॉग रेस्क्यू टीमला बोलाविले. तसेच, भटके श्वान पकडण्यासाठी स्थानिक नागरिकदेखील रस्त्यावर उतरले. काही श्वान पकडून महापालिकेच्या ताब्यात देण्यात आले. या भागात गेल्या काही महिन्यांपासून भटक्या श्वानांचा त्रास वाढला असून, प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली. आंबेगाव पठार भागात गेल्या महिनाभरात ३० श्वानांचे लसीकरण करून त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तसेच, या भागात भटके श्वान पकडण्यासाठी दोन स्वतंत्र गाड्यांची आणि लसीकरणासाठी एका गाडीची व्यवस्थादेखील करण्यात आली आहे, अशी माहिती महापालिकेच्या मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे-भोसले यांनी दिली.



शहरातील अनेक भागांत भटक्या श्वानांची समस्या गंभीर होत चालली आहे. त्यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन रस्त्यावरून ये-जा करावी लागत आहे. भटक्या श्वानांना पकडून त्यांची नसबंदी करण्यासाठी महापालिकेकडून नियोजन केले जाते. एप्रिल २४ ते नोव्हेंबर २४ या आठ महिन्यांच्या काळात महापालिकेने १६ हजार ४७९ श्वानांना पकडून त्यांच्यावर नसबंदी शस्त्रक्रिया करून त्यांचे लसीकरण केले आहे, असे भोसले यांनी सांगितले.शिवसेनेचे (ठाकरे गट) वसंत मोरे यांनी या घटनेवर तीव्र चिंता व्यक्त केली. याविषयी त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना निवेदन दिले असून, मोकाट श्वानांचा बंदोबस्त करण्याबरोबरच डॉग पार्क आणि डॉग शेल्टरचे काम मार्गी लावण्याची मागणी केली. 'महापालिकेच्या शिंदेवाडी येथील जुन्या जकात नाक्याची जागा अशा उपद्रवी भटक्या श्वानांच्या उपचार व देखरेखीसाठी द्यावी, अशी मागणी मार्च २०२३ मध्ये प्रशासनाकडे केली होती. मात्र त्यावर अद्यापही कोणतीही कार्यवाही झालेली नाही,' असे मोरे म्हणाले.

### रात्रीच्या वेळी अधिक त्रास

भटक्या श्वानांचा त्रास वाहनचालकांना सहन करावा लागतो. हे श्वान वाहनचालकांच्या दिशेने भुंकत आणि धावत जात असल्याने अनेकदा अपघात घडत आहेत. गेल्या आठवड्यात आळंदी येथेदेखील भटक्या श्वानाने अनेकांना चावा घेतल्याचा प्रकार घडला होता.आंबेगाव पठार येथील घटनेनंतर महापालिकेच्या पथकाने या भागात कारवाई करून मोकाट श्वानांना पकडल्याचा दावा केला जात आहे. गेल्या २० दिवसांत या भागातील २१८ श्वानांना पकडून त्यांची नसबंदी, लसीकरण केले आहे. तसेच, सध्या या भागातील १८ श्वान लसीकरण आणि नसबंदी करण्यासाठी महापालिकेच्या ताब्यात असल्याचा दावा केला जात आहे.

## विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून

# श्री मोरया गोसावी महाराज संजीवन समाधी सोहळा उत्साहात

## सुमारे 1 लाख मोरया भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

### पोलिसांना वाढदिवसाच्या दिवशी आपल्या कुटुंबियांसोबत वेळ घालवता येणार

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ह.भ.प. पुरुषोत्तम दादा पाटील यांच्या काल्याच्या किर्तनासह महापूजा, नगरप्रदक्षिणा, या धार्मिक कार्यक्रमांनी आणि भव्य आतिषबाजीबरोबरच महाप्रसादाने व धुपारतीने श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज यांच्या ४६३ व्या संजीवन समाधी सोहळ्याची सांगता झाली.**



समारोपाच्या दिवशी पहाटे चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव आणि चिंचवड ब्रम्हवृंद यांच्या श्रींच्या संजीवन समाधीची विधिवत महापूजा करण्यात आली. त्यानंतर त्यानंतर मंदिरावर पुष्पवृष्टी करण्यात आली व टाळ आणि वाद्यांच्या गजरात 'श्रीं'च्या पालखीची नगरप्रदक्षिणा पार पडली. यावेळी हजारो मोरया भक्तांनी या नगरप्रदक्षिणेत सहभाग घेत पालखीचे भक्तिभावे दर्शन घेतले. यावेळी ह.भ.प पुरुषोत्तम दादा पाटील यांच्या काल्याच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या कीर्तनात त्यांनी काल्याच्या कीर्तनाचे महत्व सांगितले. ते म्हणाले की, काला म्हणजे सामाजिक ऐक्य आहे. कोण लहान, कोण मोठा, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, अमक्या जातीचा, तमक्या धर्माचा हे सर्व भेदभाव ज्या ठिकाणी गळून पडतात, त्याला काला म्हणतात. त्याचबरोबर काला म्हणजे प्रेमाचे दर्शन आहे.

भक्ताचे आपल्या देवावर आणि देवाचे आपल्या भक्तावर असलेले प्रेम म्हणजे काला आहे.

कोणताही धार्मिक सोहळा असू द्या किंवा धार्मिक सप्ताह असू द्या. बऱ्याचदा प्रत्येकाला आपापल्या व्यक्तिगत जबाबदारीमुळे त्या कार्यक्रमांना उपस्थित राहता येत नाही. मात्र नाराज होण्याची गरज नाही. कारण असं म्हणतात की संपूर्ण सोहळ्याचे, सप्ताहाचे किंवा कार्यक्रमाचे सार हे काल्याच्या कीर्तनात असते. जर तुम्हाला काल्याच्या कीर्तनाचा लाभ मिळाला तरी तुम्हाला त्या संपूर्ण सोहळ्याचे पुण्य लाभते, असेही ह.भ.प. पाटील आपल्या कीर्तनात म्हणाले.

काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुमारे १ लाखांहून अधिक भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संध्याकाळी श्री गजलक्ष्मी या ढोलताशा पथकाकडून ढोलताशांच्या गजरात श्रीमोरया गोसावी महाराज यांना मानवंदना देण्यात आली.

#### नामवंत व्याख्यात्यांच्या व्याख्यानांचे आयोजन

फटाक्यांच्या भव्य आतिषबाजीने संपूर्ण मंदिर परिसर दणाणून गेला होता. त्यानंतर श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधी मंदिर येथे श्री मोरया गोसावी महाराज यांच्या परंपरेतील २१ पदांची धुपारती आणि श्री मंगलमूर्ती वाडा याठिकाणी ११ पदांची धुपारती करून यावर्षीच्या ४६३ व्या संजीवन समाधी सोहळ्याचा समारोप करण्यात आला. पाच दिवस चाललेल्या या संजीवन समाधी सोहळ्यात विविध धार्मिक – सामाजिक कार्यक्रम, नामवंत कलाकारांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे, तसेच नामवंत व्याख्यात्यांच्या व्याख्यानांचे व पुरस्कार सोहळ्याचे व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

---

# निळ्या पूर रेषेतील जुन्या अधिकृत बांधकामांना वाढीव टीडीआर द्या

### आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत उपस्थित केला औचित्याचा मुद्दा

। चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**निळ्या पूर रेषेतील बाधित जुन्या अधिकृत बांधकामांना वाढीव टीडीआर देऊन पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केला जावा, अशी आग्रही मागणी आमदार शंकर जगताप यांनी आज (शनिवारी) विधानसभेत केली.**




आमदार जगताप यांनी चिंचवड मतदारसंघातील निळ्या पूर रेषेतील जुन्या अधिकृत बांधकामांबाबत औचित्याचा मुद्दा विधान सभेत उपस्थित केला.

जगताप म्हणाले की, चिंचवड, रावेत वाकड, ताथवडे, पुनावळे, सांगवी, पिंपळे गुरव या पवनानदीच्या पात्रालगत व त्याच बरोबर इंद्रायणी आणि मुळा नदीच्या दाट वस्तीत असलेल्या जुन्या इमारती जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे त्या इमारतींमधील पार्किंग व्यवस्था अपुरी पडत आहे.या परिस्थितीमध्ये त्या जुन्या सोसायट्यांचा पुनर्विकास करण्यासाठी महाराष्ट्र एकात्मिक विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार प्रस्ताव सादर करण्यात आले होते. तथापि, 30 जानेवारी 2023 च्या सुधारित UDCPR च्या 11.2.8 अन्वये पाटबंधारे विभागाने निळ्या पूर रेषेतील क्षेत्रात हस्तांतरित विकास हक्क (TDR) वापरण्यास परवानगी नाकारली आहे. परिणामी, पूर रेषेतील अधिकृत बांधकामांना अतिरिक्त टीडीआर वापरण्याची परवानगी न मिळाल्याने त्या इमारतींच्या पुनर्विकासाला अडचणी निर्माण झाल्या आहेत.

आमदार जगताप यांनी या मुद्द्यावर विधानसभेत चर्चा करतांना सांगितले की, या निर्णयामुळे रहिवाशांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले आहे आणि त्यासोबतच पुनर्विकास प्रक्रियाही ठप्प झाली आहे. जवळपास 6 लाख 51 हजार चौरस मीटर क्षेत्राचे पुनर्विकास प्रकल्प रखडले आहेत, त्यामुळे महापालिकेला होणाऱ्या महसुलाचे मोठे नुकसान होत आहे.तसेच, त्यांनी महापालिकेच्या डेव्हलपमेंट चार्जेसच्या माध्यमातून मिळणारा सुमारे 1200 कोटी रुपयांचा महसूल देखील बुडत असल्याचे निदर्शनास आणले.

यावर उपाय म्हणून, त्यांनी विधानसभेत विनंती केली की, निळ्या पूर रेषेतील बाधित जुन्या अधिकृत बांधकामांना वाढीव टीडीआर देऊन पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केला जावा, त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळेल त्याचबरोबर महापालिकेला आवश्यक महसूल प्राप्त होईल.

त्यांच्या या मागणीमुळे संबंधित क्षेत्रातील विकास प्रकल्पांसाठी एक महत्त्वाची व त्यातल्या त्यात आवश्यक सुधारणा होण्याची शक्यता आहे.

## पिंपरी चिंचवड शहरातील अनेक युवा कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक युवा कार्यकर्त्यांनी शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. खासदार बारणे यांनी मनगटावर शिवबंधन बांधून सर्वांचे पक्षात स्वागत केले. थेरगाव येथे झालेल्या पक्ष प्रवेशावेळी युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, शिवसेना जिल्हा प्रमुख निलेश तरस, युवासेना जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस, रूपेश कदम, सागर पाचार्णे यावेळी उपस्थित होते. युवा कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेची ताकद वाढली आहे. शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्याने प्रेरीत होऊन अनेक कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत आहेत. प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचा योग्य मान सन्मान राखला जाईल.




# कुठं आहे ती राज्यसभा?

**पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या आठवड्यामध्ये ११ मिनिटं लोकसभेत आले होते. त्याआधी आणि नंतर कधी ते दिसले नाहीत. लोकसभा संस्थगित झाली तेव्हा ते सभागृहात आले होते. संविधानावर चर्चा होती तेव्हा ते प्रयागराजमध्ये होते. चर्चेचा शेवट मोदींनी केला हे खरं.**

चर्चा फक्त लोकसभेत नव्हती. राज्यसभेतही होती. वरिष्ठ सभागृहातही ते उत्तर देतील असं मानलं जात होतं. चर्चा दोन्ही सभागृहांत होती, त्यामुळं त्यांनी दोन्हीकडं बोलणं अपेक्षित होतं. मोदी राज्यसभेत बोलले नाहीत. चर्चा अमित शहा सुरू करतील असंही म्हटलं जात होतं. मग, नड्डांच्या नावाची चर्चा होती. अखेर चर्चा निमूताईंनी सुरू केली. त्यानंतर नड्डा बोलले आणि वादग्रस्त अखेर अमित शहांनी केली. राज्यसभेतील या संपूर्ण चर्चेमध्ये मोदींनी कोणतीही रुची दाखवली नाही असं विरोधकाचं म्हणणं होतं. ते राज्यसभेकडं फिरकलेही नाहीत. संसदेचं हिवाळी अधिवेशन चार आठवडे चाललं, प्रत्येक आठवड्यातील किमान एक दिवस तरी मोदींनी आपली पावलं राज्यसभेकडं वळवावी अशी विरोधकांची अपेक्षा होती. पण, ते बहुधा राज्यसभेचा रस्ता विसरले असावेत. तसंही नव्या संसद भवनामध्ये सभागृह सापडणं मुश्कील असतं. लोकसभेच्या एक महिला सदस्या वाट चुकल्या,



त्यांना सभागृह शोधता येईना. मग, त्यांनी साहाय्यकाला बोलवून आणलं. हा साहाय्यक त्यांना लोकसभेकडं घेऊन गेला. 'आता तुम्ही डावीकडं वळा म्हणजे तुम्हाला लोकसभेत जाता येईल', असं तो या महिला खासदाराला सांगताना दिसला. अशी वाट चुकू शकते हे मान्य केलं पाहिजे. त्यामुळं मोदी कदाचित राज्यसभेत आले नसावेत. त्यांनी संविधानाची चर्चा निदान सभागृहात तरी बसून ऐकली नाही. त्या चर्चेलाही उत्तर दिलं नाही. या वेळी अधिवेशनामध्ये राज्यसभा अगदीच पोरकी झाली होती असं कोणाला वाटतं तर?केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या वादग्रस्त विधानाने एक काम चांगलं केलं. संसदेच्या आवारात एका कोपऱ्यात अडगळीत पडलेले महापुरुषांचे पुतळे पुन्हा प्रसिद्धीच्या झोतात आले. पूर्वी कधी संसदेमध्ये गेला असाल तर आताचं संसदेचं नवं रूपडं पाहून आश्चर्यचकित व्हाल. त्यातही नव्या संसद भवनात गेलात तर कुठल्या तरी कॉर्पोरेट ऑफिसमध्ये गेल्याचा भास होऊ शकतो. पूर्वी संसदेचं आवार मोकळं-ढाकळं आणि हिरवंगार असायचं. समोर महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांचे पुतळे होते. प्रत्येक मराठी माणसाला हे पुतळे संसदेच्या दर्शनी भागात पाहून अभिमान वाटत असे. सुशोभीकरणाच्या नावाखाली मराठी माणसाचा अभिमान खरंतर हिरावून घेतला गेला आहे! हे सगळे पुतळे जुन्या संसदेच्या कोपऱ्यात उभे केले गेले आहेत. संसदेच्या या भागात वाट वाकडी करून कोणी जात नाही. पूर्वी गांधी, आंबेडकरांचे पुतळे लोकांना दिसत असत. अनेकदा गांधी पुतळ्यासमोर उभा राहून विरोधी पक्षांनी निदर्शनं केली आहेत. उपोषणं केली आहेत. रात्रभर विरोधी पक्षांचे सदस्य ठिय्या देऊन बसलेले पाहिले आहेत. त्यामुळं हे पुतळे फक्त शोभेची वस्तू नव्हते. या पुतळ्यांना लोकशाहीचं वेगळं स्वरूप होतं. हेच पुतळे एकाच स्थळावर एकत्रितपणे उभे केलेले आहेत. त्या पुतळ्यांकडं संसदेच्या सदस्यांचं लक्षही नव्हतं. पण, शहांनी विरोधकांना निदर्शनं करायला भाग पाडलं, तेव्हा विरोधकांनाही डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याची आठवण झाली. त्यांना हा पुतळा शोधावा लागला असेल. सलग दोन दिवस विरोधकांनी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याशेजारी उभं राहून शहांविरोधात निदर्शनं केली. या पुतळ्याशेजारी महात्मा गांधींचा पुतळा असल्यानं त्यानिमित्ताने संसद सदस्यांनी गांधीजीही पाहिले असतील. विरोधकांच्या आंदोलनामुळं संसदेच्या आवारात नामवंतांचे पुतळे आहेत याची आठवण तरी झाली. संसदेच्या आवारातील ही निदर्शनं बंद केली गेली तर हे पुतळे कायमचे विस्मृतीत जातील. तसंही इतिहास पुसायला असा किती वेळ लागतो?लोकसभेत संविधानावरील चर्चेमध्ये राहुल गांधींचं भाषण भाजप किंवा त्यांच्या घटक पक्षांतील कोणी नेत्याने आधी वाचलं असेल असं वाटत नाही. सावरकरांचा मुद्दा ते मांडतील याची राहुल गांधींच्या चमूला किंवा काँग्रेसमधील त्यांच्या निष्ठावान नेत्यांनाच माहीत असेल इतकंच.

## प्रासंगिक »

### प्रकाशाचे सांध्यपर्व!

***भारतीय क्रिकेट चालविणाऱ्यांनी अश्विनच्या निवृत्तीच्या निमित्ताकडे समस्या नाही, उत्तरदायित्व म्हणून पाहणे गरजेचे आहे...***

भारतीय क्रिकेट संघ जेव्हा ऑस्ट्रेलियासारख्या कठीण दौऱ्यावर निघाला, तेव्हा त्यातील चार खेळाडू कारकीर्दीचा संधिकाल सुरू असलेले होते, आहेत. न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर सपाटून मार खाऊन ऑस्ट्रेलियात चाललेल्या या संघाकडून फारशी अपेक्षा नसतानाही या चमूने पहिला सामना जिंकला खरा; पण दुसऱ्या सामन्यातील वाताहत आणि तिसऱ्यात याच मार्गावरून वाटचाल सुरू असताना पाऊस मदतीला आल्याने वाचलेली इभ्रत पाहता, आत्ताचा संघ या दौऱ्यानंतर मोठ्या स्थित्यंतरातून जाणार हे स्पष्ट आहे. त्या स्थित्यंतरातील एक थोडा अनपेक्षित आणि चुटपुट लावून गेलेली 'कलाटणी' म्हणजे फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनची निवृत्ती. अश्विनचे वय पाहता खरे तर त्याची निवृत्ती अकाली वगैरे नाही. कोणताही चांगला आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू वयाच्या विशीत आंतरराष्ट्रीय कारकीर्दीला सुरुवात करून तिशीच्या उत्तरार्धात निवृत्त होतो.

गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत भाषण करत असताना आंबेडकर.... आंबेडकर असे सहा वेळा म्हणत, 'हे नाव घ्यायची एक फॅशन झाली आहे. इतक्या वेळा जर तुम्ही देवाचे नामस्मरण केले असते तर तुम्हाला स्वर्गप्राप्ती झाली असती...' अशी मल्लिनाथी केली.

# अमित शहांना आंबेडकर 'फॅशन'च वाटणार!



या वक्तव्यावर गदारोळ सुरू झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवर अमित शहांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला.शहांनी १२ वर्षात पहिल्यांदा पत्रकारपरिषद घेतली ती यावर स्पष्टीकरण देण्यासाठी. मात्र या वेळीही त्यांनी त्यांच्या या वक्तव्याबद्दल माफी न मागता, काँग्रेसने आंबेडकरांवर अन्याय केला, हे सांगितले. दुसऱ्याचे चूक, म्हणून अमित शहा यांनी केलेल्या या प्रमादाची तीव्रता कमी होत नाही. मुळात मनुवादी विचार करणाऱ्या आणि त्यांचे समर्थन करणाऱ्या अमित शहा यांना बाबासाहेब आणि त्यांच्या विचारांचे काही देणे – घेणे नाही हे सर्वश्रुत आहे. बाबासाहेबांबद्दल तोंडदेखला अभिमान व्यक्त केला, तरीही त्यांच्या जे मनात दबले होते ते ओठांवर आले आहे. अमित शहांना आम्ही अभिमानाने सांगू इच्छितो : होय, माझ्यासह कोट्यवधी लोक डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या विचारांवर जगणारे आहोत. बाबासाहेबांनी ज्या क्रांतिकारी भूमिका, निर्णय घेतले आणि त्या निर्णयांची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली, यामुळे देशातल्या तमाम दलित, आदिवासी, मागासवर्गीय आणि महिला यांच्यासह स्वातंत्र्य, समता, बंधुता मांडणाऱ्या समाज घटकांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाले. समाजाला एकत्रित करण्याचे महत्त्वाचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात केले. हाच विचार अंगिकारत आम्ही फक्त आंबेडकर... आंबेडकर... हे नाव घेऊनच जगू इच्छितो. भारतातल्या जाती, धर्म आणि वर्णव्यवस्थेने सर्व समाजात ज्या पद्धतीची दुफळी अनाचार माजवला होता तो बाबासाहेबांनी अत्यंत कष्टाने, अभ्यासाने आणि आपल्या जीवनाची, आरोग्याची पर्वा न करता लोकांसाठी खस्ता खाऊन संपवला. संविधान निर्मिती आणि बौद्ध धर्म अंगीकारण्याची त्यांची भूमिका हा त्याचाच परिपाक आहे. संविधानात डॉ. आंबेडकरांमुळे सामाजिक न्यायाची दृष्टी आली. तत्कालीन सामाजिक – राजकीय व्यवस्थेने बाबासाहेबांची भूमिका मान्य केल्यामुळे आम्हा सर्व लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाले. पण हेच बदल पारंपारिक जात, धर्म, वर्ण व्यवस्था मांडणाऱ्या समाज घटकांना आजही मान्य नाहीत हे वारंवार सिद्ध होत आहे. अमित शहा यांच्या तोंडून बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल जी कुत्सित भावना व्यक्त झाली ती या भूमिकेचा परिपाक आहे.पुण्यात दोन दिवसांपूर्वी एका कार्यक्रमाच्या निमित्ताने आलेल्या एका शंकराचार्यांनी वैदिक संविधान म्हणजे मनुस्मृती असे वक्तव्य केले आहे. मनुस्मृतीचा मी अभ्यास केला आहे त्याच्यातील विषमता आणि घटनेतील समता ही कोणत्याही अभ्यासकाला सहज कळण्यासारखी आहे. याउलट बाबासाहेबांनी जे संविधान या देशाला दिले, ते सर्व जाती – धर्म यांना एकत्र बांधून ठेवणारे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंबई सागरी मंडळाची कडक कारवाई!

## नीलकमल बोटीचा प्रवासी परवाना, नोंदणी प्रमाणपत्र निलंबित

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेट वे ऑफ इंडिया येथून घारापुरीला जाणाऱ्या 'नीलकमल' बोटीला बुधवारी झालेल्या अपघाताच्या चौकशीअंतर्गत बोटीतून क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी प्रवास करीत असल्याचे स्पष्ट झाले. याची गंभीर दखल घेत मुंबई सागरी मंडळाने अखेर आता 'नीलकमल' बोटीचा प्रवासी परवाना, नोंदणी प्रमाणपत्र आणि सर्व्हे प्रमाणपत्र निलंबित केले आहे.**



### इंजिन ड्रायव्हरविरोधातही कारवाई

'नीलकमल' बोटीची प्रवासी क्षमता ८० प्रवासी आणि सहा कर्मचारी अशी होती.ही बाब गंभीर असल्याने नीलकमल बोटीचा प्रवासी परवाना, नोंदणी प्रमाणपत्र आणि सर्व्हे प्रमाणपत्र बुधवारी निलंबित करण्यात आल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. कोणत्याही बोटीवरून प्रवासी वाहतूक करण्यासाठी ही तिन्ही प्रमाणपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. ही तिन्ही प्रमाणपत्रे रद्द झाल्याने 'नीलकमल' बोटी, मालकाविरोधातील ही महत्त्वाची कारवाई मानली जात आहे. प्रवासी क्षमतेच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मालकाविरोधात ही कारवाई करताच दुसरीकडे सागरी मंडळाने बोट मास्टर आणि इंजिन ड्रायव्हरविरोधातही कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सध्या या दोघांची चौकशी सुरू आहे.

तसेच बोटीतील डेकची जबाबदारी असणाऱ्या बोट मास्टर आणि इंजिनची जबाबदारी असणाऱ्या इंजिन ड्रायव्हरची चौकशी सध्या सुरू आहे. यांच्यावरही क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेतल्याचा ठपका असून चौकशीअंती या दोघांविरोधातही कडक कारवाई करून त्यांचा परवाना प्रमाणपत्र निलंबित करण्याचे संकेत सागरी मंडळाने दिले आहेत. घारापुरीजवळ प्रवासी बोटीवर नौदलाची स्पीड बोट आदळून बुधवार झालेल्या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला. यामुळे जलवाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. 'नीलकमल' बोटीला नौदलाच्या बोटीने धडक दिल्याने अपघात झाला. मात्र 'नीलकमल' बोटीवरील कर्मचाऱ्यांकडून प्रवासी वाहतुकीसंदर्भातील नियमांचे उल्लंघन झाल्याची माहिती सागरी मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. 'नीलकमल' बोटीची प्रवासी क्षमता ८० प्रवासी आणि सहा कर्मचारी अशी होती. असे असताना या बोटीवर अपघातादरम्यान एकूण ११० प्रवासी आणि ५ कर्मचारी असल्याचे स्पष्ट झाल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. ही बाब गंभीर असल्याने नीलकमल बोटीचा प्रवासी परवाना, नोंदणी प्रमाणपत्र आणि सर्व्हे प्रमाणपत्र बुधवारी निलंबित करण्यात आल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. कोणत्याही बोटीवरून प्रवासी वाहतूक करण्यासाठी ही तिन्ही प्रमाणपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. ही तिन्ही प्रमाणपत्रे रद्द झाल्याने 'नीलकमल' बोटी, मालकाविरोधातील ही महत्त्वाची कारवाई मानली जात आहे. प्रवासी क्षमतेच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मालकाविरोधात ही कारवाई करताच दुसरीकडे सागरी मंडळाने बोट मास्टर आणि इंजिन ड्रायव्हरविरोधातही कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सध्या या दोघांची चौकशी सुरू आहे. बोटीचा सर्वेसर्वा म्हणजे बोट मास्टर. संपूर्ण बोटीची, डेकची जबाबदारी बोट मास्टरवर असते. इंजिनची जबाबदारी इंजिन ड्रायव्हरवर असते. बोटीत क्षमतेनुसारच प्रवासी घेण्याची संपूर्ण जबाबदारी या दोघांची असते. पण 'नीलकमल' बोटीत अधिक प्रवासी घेण्यात आल्याने या दोघांची चौकशी सुरू आहे. चौकशीअंती या दोघांचेही परवाना प्रमाणपत्र निलंबित करण्याची कारवाई केली जाईल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. बोट मास्टर आणि इंजिन ड्रायव्हर म्हणून काम करण्यासाठी मुंबई सागरी मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होऊन परवाना प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते. या प्रमाणपत्राशिवाय बोट मास्टर आणि इंजिन ड्रायव्हर म्हणून काम करता येत नाही.या कारवाईमुळे जलवाहतुकीसंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना चपराक बसेल, असेही म्हटले जाता आहे. प्रवासी क्षमतेच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मालकाविरोधात ही कारवाई करताच दुसरीकडे सागरी मंडळाने बोट मास्टर आणि इंजिन ड्रायव्हरविरोधातही कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सध्या या दोघांची चौकशी सुरू आहे. बोटीचा सर्वेसर्वा म्हणजे बोट मास्टर. संपूर्ण बोटीची, डेकची जबाबदारी बोट मास्टरवर असते. इंजिनची जबाबदारी इंजिन ड्रायव्हरवर असते. बोटीत क्षमतेनुसारच प्रवासी घेण्याची संपूर्ण जबाबदारी या दोघांची असते. पण 'नीलकमल' बोटीत अधिक प्रवासी घेण्यात आल्याने या दोघांची चौकशी सुरू आहे. चौकशीअंती या दोघांचेही परवाना प्रमाणपत्र निलंबित करण्याची कारवाई केली जाईल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. बोट मास्टर आणि इंजिन ड्रायव्हर म्हणून काम करण्यासाठी मुंबई सागरी मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होऊन परवाना प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते. या प्रमाणपत्राशिवाय बोट मास्टर आणि इंजिन ड्रायव्हर म्हणून काम करता येत नाही. बोटीतील डेकची जबाबदारी असणाऱ्या बोट मास्टर आणि इंजिनची जबाबदारी असणाऱ्या इंजिन ड्रायव्हरची चौकशी सध्या सुरू आहे. घारापुरीजवळ प्रवासी बोटीवर नौदलाची स्पीड बोट आदळून बुधवार झालेल्या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला. यामुळे जलवाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. 'नीलकमल' बोटीला नौदलाच्या बोटीने धडक दिल्याने अपघात झाला.

# नाथाभाऊ अन् मंत्री गिरीश महाजनांमध्ये जुंपली

## पीआयच्या मृत्यू प्रकरणावरून विधानपरिषदेतच नेत्यांची खडाजंगी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानपरिषदेत आज मंत्री गिरीश महाजन (GIRISH MAHAJAN) आणि राष्ट्रवादीचे आमदार एकनाथ खडसे (EKNATH KHADSE) यांच्यात जोरदार खडाजंगी झाल्याचं पाहायला मिळालं. गिरीश महाजन यांच्याकडून एकनाथ खडसे यांच्याकडे निर्देश करत सदरे नावाच्या पीआयने आत्महत्या कुणामुळे केली हे स्पष्ट करण्याची मागणी केली.**

तर वाळू माफिया, अवैध उत्खनन केल्याचा खडसेंवर गंभीर आरोप केला. यामुळेच कुटुंबातील लोकांना 3 वर्ष जेलमध्ये राहावं लागल्याचा आरोप गिरीश महाजन यांनी केला आहे. तर खडसेंकडून देखील जळगाव जिल्ह्यात वाळू उपसा आणि अवैध धंदे महाजन यांच्या आशीर्वादाने सुरू असल्याचा आरोप केला. आज विधानसपरिषदेत गिरीश महाजन विरुद्ध एकनाथ खडसे असा सामना रंगल्याचं पाहायला मिळालं. दोन्ही नेत्यांनी एकमेकांवर जोरदार आरोप केले. सगळ्या जिल्ह्याला माहित आहे की, वाळूचे अवैध धंदे कोण करते असे म्हणत महाजन यांगी खडसे



यांच्यावर टीका केली. चोऱ्या कोणी केल्या हे सर्वांना माहित असल्याचेही महाजन म्हणाले. वाळू माफिया संदर्भात माझा काही संबंध असेल तर चौकशी करा वाळू माफिया संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सुरु आहे. गेली पाच वर्ष झालं कोणाचं सरकार आहे. सरकार याकडं का लक्ष देत नाही असे एकनाथ खडसे यावेळी म्हणाले. वाळू माफिया संदर्भात तुम्ही बांगड्या घातल्यात का? असे खडसे म्हणाले. कापसाला तुम्ही का दर देत नाहीत? असेही खडसे यावेळी म्हणाले. मी माझे मुद्दे मांडत आहे, कोणाच्या बुडाला

### सरकार यावर कारवाई करत नाही

ग्रामीण भागात देखील घटना घडत आहेत. दिवसाढवळ्या खून होत आहेत, याची देखील चौकशी झाली पाहिजे असेही खडसे म्हणाले. या गुन्ह्यातील आरोपी पकडले जात नाहीत, हे गंभीर असल्याचे खडसे म्हणाले. वाळूमाफियांनी अधिकाऱ्यांना मारहाण केली आहे. वारंवार असे प्रकार जळगाव जिल्ह्यात घडत असल्याचे खडसे म्हणाले. अधिकाऱ्यांच्या अंगावर गाडी घालण्याचे प्रकार होत आहेत. वाळूच धोरण बदललं पाहिजे नाहीतर या घटना अशाच वाढत जातील असे खडसे म्हणाले. वाळू माफियांवर कठोर कारवाई करण्याची गरज असल्याचे खडसे म्हणाले. पण सरकार यावर कारवाई करत नाही.

काही आग लागायची गरज नाही असे खडसे म्हणाले. नुसते आरोप करायचे, खोटे गुन्हे दाखल करायचे काम सुरु असल्याचे खडसे म्हणाले. वाळू माफिया संदर्भात माझा काही संबंध असेल तर चौकशी करा असेही खडसे म्हणाले. जळगाव जिल्ह्यात गोळीबाराच्या घटना वाढल्या जळगाव जिल्ह्यात गोळीबाराच्या

# माझ्यावरील दंड बीसीसीआयने भरावा!

## ललित मोदीवर उच्च न्यायालयाने ठोठावला लाखांचा दंड

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंडियन प्रीमियल लीगचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांना मुंबई उच्च न्यायालयाने चांगलाच झटका दिला आहे. त्यांच्यावर असलेला अंमलबजावणी संचनालयाचा १०.६५ कोटी रुपयांचा दंड बीसीसीआयने भरावा असे निर्देश देण्याची याचिका ललित मोदी यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. ही याचिका निरर्थक असल्याचे म्हणत, उच्च न्यायालयाने ती फेटाळून लावली. यासह न्यायालयाने ललित मोदी यांनी गैरसमज करणारी याचिका दाखल केल्याचे म्हणत त्यांना आणखी एक लाख रुपयांचा दंड ठोठावला.**



यावेळी उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले की, “झी टेलिफिल्म्सच्या एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले होते की घटनेच्या कलम १२ नुसार बीसीसीआय हे ‘राज्य’ नाही, त्यामुळे त्याविरुद्धची याचिका कायम ठेवता येणार नाही.”ललित मोदी यांनी परकीय चलन व्यवस्थापनाचे उल्लंघन केल्याबद्दल, अंमलबजावणी संचनालयाने त्यांना २०१८ मध्ये १०.६५ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. ललित मोदींनी हा दंड बीसीसीआयने भरावा असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने द्यावेत म्हणून याचिका दाखल केली होती. ललित मोदी त्यावेळी बीसीसीआयचे उपाध्यक्ष होते. त्या काळात त्यांची बीसीसीआयची उपसमिती असलेल्या आयपीएल प्रशासकीय समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. उपनियमांनुसार, बीसीसीआयने मोदींना नुकसानभरपाई देणे आवश्यक आहे, असा दावा याचिकेत करण्यात आला होता.२००९ च्या इंडियन प्रीमियर लीग (IPL) स्पर्धेतबाबत ईडीने तपास केला होता. मोदींवरील दंड हा ईडीने केलेल्या मोठ्या तपासाचा भाग होता, जिथे FEMA नियमांचे उल्लंघन करून २४३ कोटींहून अधिक रक्कम कथितपणे भारताबाहेर हस्तांतरित करण्यात आली होती.

भारतात लोकसभा निवडणुकीचा कालावधी असल्याने २००९ मध्ये आयपीएल स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत आयोजित करण्यात आली होती.२०१८ मध्ये ईडीने बीसीसीआयचे तत्कालीन अध्यक्ष एन श्रीनिवासन आणि इतरांवर मिळून १२१.५६ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. यामध्ये ललित मोदी यांच्या वाट्याला १०.६५ कोटी रुपयांचा दंड आला होता. हा दंड बीसीसीआयला भरण्याचे निर्देश द्यावेत म्हणून ललित मोदी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.इंडियन प्रीमियल लीगचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांना मुंबई उच्च न्यायालयाने चांगलाच झटका दिला आहे. त्यांच्यावर असलेला अंमलबजावणी संचनालयाचा १०.६५ कोटी रुपयांचा दंड बीसीसीआयने भरावा असे निर्देश देण्याची याचिका ललित मोदी यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. ही याचिका निरर्थक असल्याचे म्हणत, उच्च न्यायालयाने ती फेटाळून लावली. यासह न्यायालयाने ललित मोदी यांनी गैरसमज करणारी याचिका दाखल केल्याचे म्हणत त्यांना आणखी एक लाख रुपयांचा दंड ठोठावला. यावेळी उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले की, “झी टेलिफिल्म्सच्या एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले होते की घटनेच्या कलम १२ नुसार बीसीसीआय हे ‘राज्य’ नाही, त्यामुळे त्याविरुद्धची याचिका कायम ठेवता येणार नाही.”ललित मोदी यांनी परकीय चलन व्यवस्थापनाचे उल्लंघन केल्याबद्दल, अंमलबजावणी संचनालयाने त्यांना २०१८ मध्ये १०.६५ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. त्या काळात त्यांची बीसीसीआयची उपसमिती असलेल्या आयपीएल प्रशासकीय समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

### एक लाख रुपयांचा दंड ठोठावला

भारतात लोकसभा निवडणुकीचा कालावधी असल्याने २००९ मध्ये आयपीएल स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत आयोजित करण्यात आली होती.२०१८ मध्ये ईडीने बीसीसीआयचे तत्कालीन अध्यक्ष एन श्रीनिवासन आणि इतरांवर मिळून १२१.५६ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. यामध्ये ललित मोदी यांच्या वाट्याला १०.६५ कोटी रुपयांचा दंड आला होता. हा दंड बीसीसीआयला भरण्याचे निर्देश द्यावेत म्हणून ललित मोदी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.इंडियन प्रीमियल लीगचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांना मुंबई उच्च न्यायालयाने चांगलाच झटका दिला आहे. त्यांच्यावर असलेला अंमलबजावणी संचनालयाचा १०.६५ कोटी रुपयांचा दंड बीसीसीआयने भरावा असे निर्देश देण्याची याचिका ललित मोदी यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. यासह न्यायालयाने ललित मोदी यांनी गैरसमज करणारी याचिका दाखल केल्याचे म्हणत त्यांना आणखी एक लाख रुपयांचा दंड ठोठावला.

---

# ख्रिसमस मार्केटवर प्राणघातक कार हल्ला

## सौदीच्या डॉक्टरला अटक; भयंकर हल्ल्याचा व्हिडिओ व्हायरल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जर्मनीतील मॅग्डेबर्ग शहरातील ख्रिसमस मार्केटमध्ये एका व्यक्तीने खरेदी करत असलेल्या लोकांवर हल्ला करत कारने उडवले. यामध्ये एका लहान मुलासह दोघांचा मृत्यू झाला आहे. याचबरोबर ६० हून अधिक लोक जखमी झाल्याचे समोर आले आहे. यामध्ये १५ जण गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान जर्मन पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हा अपघात नसून, ठरवून केलेला हल्ला आहे.**

हा हल्ला शुक्रवारी सायंकाळी सातच्या सुमारास झाला आहे. दरम्यान पोलिसांनी मृतांची संख्या वाढू शकते अशी माहिती दिली आहे.सॅक्सोनी-अनहॉल्ट राज्याचे पंतप्रधान रेनर हॅसेलॉफ यांनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोर कार चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. हॅसेलॉफ म्हणाले की, “प्राथमिक माहितीवरून असे दिसते की, चालकाने एकट्याने हा हल्ला केला आहे. त्याला अटक केल्यामुळे शहराला आता कोणताही धोका नाही. मॅग्डेबर्ग शहर सॅक्सोनी-अनहॉल्ट राज्याची राजधानी आहे. या शहराची अंदाजे २४०,००० इतकी लोकसंख्या आहे. आठ वर्षांपूर्वी जर्मनीची राजधानी बर्लिनमध्ये अशीच एका घटना घडली होती. त्यावेळी एका ट्रकने ख्रिसमस मार्केटमध्ये १३ जणांना चिरडले होते. ख्रिसमस मार्केट ही जर्मनीतील अनेक वर्षांपासून चालत आलेली परंपरा आहे. दरवर्षी लाखो लोक ख्रिसमच्या खरेदीसाठी त्याकडे आकर्षित होतात.जर्मनीतील मॅग्डेबर्ग शहरात शुक्रवारी सायंकाळी ख्रिसमस मार्केटच्या गर्दीवर कार हल्ला करणाऱ्या आरोपीचे नाव तालेब असे आहे. पेशाने डॉक्टर असलेला आरोपी ५० वर्षांचा आहे. द गार्डियनने दिलेल्या वृत्तानुसार, तालेब ए. मानसोपचारतज्ञ आहे. तो २००६ पासून जर्मनीत राहत होता आणि २०१६ मध्ये त्याला निर्वासिताचा दर्जा मिळाला होता.जर्मनीतील मॅग्डेबर्ग येथील ख्रिसमस मार्केटमध्ये एक कार गर्दीत घुसल्याने एका लहान मुलासह किमान दोघांची बळी गेला. शहराच्या प्रशासनाने या हल्ल्यात ६८ जण जखमी झाल्याची नोंद केली असून, १५ जणांची प्रकृती गंभीर आहे.



### 60 हून अधिक लोक जखमी

स्थानिक अधिकाऱ्यांनी या घटनेला दहशतवादी हल्ला असल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार काळ्या रंगाची बीएमडब्ल्यू टाऊन हॉलजवळ गर्दीत ४० मीटर आतपर्यंत घुसली होती. दरम्यान या घटनेचे व्हिडिओ समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.जर्मनीतील मॅग्डेबर्ग शहरातील ख्रिसमस मार्केटमध्ये एका व्यक्तीने खरेदी करत असलेल्या लोकांवर हल्ला करत कारने उडवले. यामध्ये एका लहान मुलासह दोघांचा मृत्यू झाला आहे.

# नाना आमिरचा 'तो' व्हिडीओ व्हायरल



नाना पाटेकर यांचा 'वनवास' चित्रपट शुक्रवारी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात उत्कर्ष शर्मा व सिमरत कौरदेखील आहे. नाना पाटेकर त्यांचा खास मित्र अभिनेता आमिर खानसाठी या सिनेमाचे स्क्रीनिंग ठेवणार आहेत, अशी चर्चा होती. याच दरम्यान, या दोघांच्या एका व्हिडीओने लक्ष वेधून घेतले आहे. नाना व आमिर यांनी आज मुंबईतील जुहू येथे पॉडकास्टसाठी शूटिंग केलं. या शूटिंगदरम्यानचा त्यांचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. दोघांच्या पॉडकास्टबद्दलही चाहत्यांमध्ये उत्सुकता पाहायला मिळत आहे. नाना पाटेकर आणि आमिर खान 'वनवास'वर या पॉडकास्टमध्ये चर्चा करताना दिसतील. नाना पाटेकर व आमिर खानचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. फिल्मीज्ञानने शेअर केलेल्या या व्हिडीओत दोघेही कठड्यावर बसून गप्पा मारताना दिसत आहे. कॉटनचे कपडे घातलेले नाना पाटेकर व आमिर खान दोघांच्या साधेपणाचं नेटकरी कौतुक करत आहेत.इन्स्टंट बॉलीवूडने शेअर केलेल्या दुसऱ्या एका व्हिडीओमध्ये नाना पाटेकर व आमिर खान हातात हात घालून गप्पा मारताना दिसत आहेत.नाना पाटेकरांच्या या चित्रपटाने पहिल्या दिवशी फार चांगली कमाई केलेली नाही. चित्रपटाला एक कोटीही कमावता आले नाही. चित्रपटाची ओपनिंग निराशाजनक राहिली आहे. सॅकनिल्कने दिलेल्या आकडेवारीनुसार, 'वनवास'ने पहिल्या दिवशी ६० लाख रुपये कमावले आहेत. ही प्रारंभिक आकडेवारी आहे.'वनवास'मध्ये नाना पाटेकर, उत्कर्ष शर्मा, सिमरन कौर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सहाय्यक कलाकारांमध्ये खुशबू सुंदर, सिमरत कौर, राजपाल यादव, अश्विनी काळसेकर, परितोष त्रिपाठी, मनीष वाधवा आणि राजेश शर्मा यांचा समावेश आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनिल शर्मा यांनी केले असून निर्मिती सुमन शर्मा यांनी केली आहे.नाना पाटेकर यांचा 'वनवास' चित्रपट शुक्रवारी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात उत्कर्ष शर्मा व सिमरत कौरदेखील आहे. नाना पाटेकर त्यांचा खास मित्र अभिनेता आमिर खानसाठी या सिनेमाचे स्क्रीनिंग ठेवणार आहेत, अशी चर्चा होती. याच दरम्यान, या दोघांच्या एका व्हिडीओने लक्ष वेधून घेतले आहे. नाना व आमिर यांनी आज मुंबईतील जुहू येथे पॉडकास्टसाठी शूटिंग केलं. या शूटिंगदरम्यानचा त्यांचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. दोघांच्या पॉडकास्टबद्दलही चाहत्यांमध्ये उत्सुकता पाहायला मिळत आहे. नाना पाटेकर आणि आमिर खान 'वनवास'वर या पॉडकास्टमध्ये चर्चा करताना दिसतील.

# जेनेलिया @36



अभिनेत्री जेनेलिया डिसूझाचा आज 37 वा वाढदिवस आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. जेनेलियाचा ट्रायल पीरियड हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. दाक्षिणात्य व हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःची ओळख निर्माण करणारी ही गुणी अभिनेत्री वयाच्या 15व्या वर्षापासूनच अभिनय करत आहे. मात्र ती एकेकाळी राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल खेळाडू होती हे फार कमी लोकांना माहीत असेल. वाढदिवसानिमित्त जाणून घेऊया जेनेलियाच्या आयुष्याविषयी काही खास गोष्टी... जेनेलियाचा जन्म मुंबईतील एका कॅथलिक कुटुंबात झाला. जेनेलियाला लहानपणापासूनच खेळाची आवड होती आणि शालेय शिक्षणादरम्यान ती राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल खेळाडू होती. मात्र त्यानंतर तिला चित्रपटांमध्ये काम करण्याची संधी मिळाली आणि तिने मार्ग बदलला. जेनेलियाचा अर्थ युनिक म्हणजेच अनोखा असा होतो. जेनेलियाने मुलाखतीदरम्यान अनेकवेळा सांगितले आहे की तिचे नाव तिच्या पालकांच्या नावातून तयार करण्यात आले आहे. जेनेलियाच्या आईचे नाव जेनेट आणि वडिलांचे नाव नील आहे. दोघांचे नाव एकत्र करून जेनेलिया हे नाव तिला देण्यात आले. जेनेलियाने अभिनयात पदार्पण महानायक अमिताभ बच्चन यांच्यासोबत केले आहे. जेनेलिया पहिल्यांदा अमिताभ बच्चन यांच्यासोबत एका जाहिरातीत दिसली होती. त्यावेळी जेनेलिया केवळ 15 वर्षांची होती. ही जाहिरात पार्कर पेनची होती. 2003 मध्ये जेनेलिया डिसूझा पहिल्यांदा रुपेरी पडद्यावर दिसली. चित्रपटाचे नाव होते 'तुझे मेरी कसम'. यामध्ये तिच्यासोबत अभिनेता रितेश देशमुख होता. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान जेनेलियाने तिचे शिक्षण पूर्ण केले.

# ममता कुलकर्णीचा मोठा खुलासा!



९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्री मराठमोळी ममता कुलकर्णी २५ वर्षांनंतर मुंबईत परत आली आहे. आता तिने मुंबईत परतण्याबाबत आणि विक्की गोस्वामीबरोबरच्या तिच्या नात्याबद्दल भाष्य केलं आहे. ममताने बॉलीवूडमध्ये पुनरागमन करायचा कोणताही विचार नसल्याचं स्पष्ट केलं आहे. विक्की गोस्वामीबरोबरच्या नात्याबद्दल म्हणाली, "माझा डी (ड्रग) जगाशी काहीही संबंध नाही, कारण मी या लोकांना कधीही भेटले नाही. होय, मी विक्की गोस्वामीशी कनेक्ट झाले. १९९६ मध्ये माझा आध्यात्मिक प्रवास सुरू झाला आणि त्या काळात माझ्या आयुष्यात एक गुरू आला. दुबईत तुरुंगात असताना विक्कीने मला फोन करून भेटायला बोलावलं. मी त्याला भेटले आणि मी १२ वर्षे घालवली. मी ध्यान आणि पूजापाठ करायचे. २०१२ मध्ये तो तुरुंगातून बाहेर आला, तेव्हापर्यंत माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या होत्या. प्रेमात पडायचं किंवा लग्न करायचं, काहीच उरलं नव्हतं. तो तुरुंगातून बाहेर आला. जोपर्यंत तो तुरुंगातून बाहेर येत नाही तोपर्यंत मी भारतात परत जाणार नाही, असं मी ठरवलं होतं. त्यानंतर, तो केनियाला गेला आणि मी २०१२-२०१३ च्या सुमारास कुंभमेळ्यासाठी भारतात आले. मी १० दिवस राहिले. मी दुबईहून थेट अलाहाबादला (आता प्रयागराज) गेले आणि मग परत दुबईला गेले."

# सानूचा सुपर फॅन

झुंझुनूचा रहिवासी असलेला कुमार सानूचा चाहता राकेश बलोदिया 1200 किलोमीटरचा प्रवास करून कुमार सानूला भेटण्यासाठी मुंबईत पोहोचला. राकेश बलोदिया झुंझुनू येथून प्रवास सुरू केला. कुमार सानू यांची त्यांच्या घरी भेट झाली. राकेश कुमार सानूच्या घरी पोहोचताच त्यांनी राकेशला मिठी मारली. राकेशनेही आवडत्या गायकाचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मुंबईत पोहोचल्यानंतर एएनआयशी बोलताना राकेश म्हणाला- मी किती आनंदी आहे हे शब्दात सांगू शकत नाही. मी बारावीत असताना कुमार सानूची गाणी पहिल्यांदा ऐकली. मी त्यांच्याकडूनच गाणे शिकले. माझ्या शहरातील लोक मला ओळखतात कारण त्यांच्याकडून शिकून मी माझ्या शहरात माझी ओळख निर्माण केली आहे.

# 'वनवास'ची निराशाजनक सुरुवात!




'गदर' आणि 'अपने' यांसारख्या चित्रपटांचे दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी दिग्दर्शित केलेला 'वनवास' चित्रपट सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. अनिल शर्मा यांचा मुलगा उत्कर्ष शर्मा आणि नाना पाटेकर हे दोघेही या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहेत. 'वनवास' चित्रपट शुक्रवारी (२० डिसेंबर) प्रेक्षकांच्या भेटीला आला. अल्लू अर्जुनचा चित्रपट 'पुष्पा 2' आधीच थिएटरमध्ये धुमाकूळ घालत आहे. त्याच दरम्यान 'वनवास' रिलीज झाला. त्याचबरोबर हॉलीवूड चित्रपट 'मुफासा'ही रिलीज झाला आहे. दोन मोठ्या चित्रपटांबरोबर प्रदर्शित झालेल्या 'वनवास'ला पहिल्या दिवशी प्रेक्षकांचा फार चांगला प्रतिसाद मिळालेला नाही. पुष्पा 2 व मुफासाची कमाई चांगली आहे. त्यामुळे त्या मोठ्या चित्रपटांबरोबर प्रदर्शित झाल्याचा फटका या सिनेमाला बसल्याचं आकडेवारीवरून स्पष्ट दिसत आहे. 'वनवास' चित्रपटाने रिलीजच्या पहिल्या दिवशी किती कमाई केली हे जाणून घेऊया. नाना पाटेकरांच्या या चित्रपटाने पहिल्या दिवशी फार चांगली कमाई केलेली नाही. चित्रपटाला एक कोटीही कमावता आले नाही. चित्रपटाची ओपनिंग निराशाजनक राहिली आहे. सॅकनिल्कने दिलेल्या आकडेवारीनुसार, 'वनवास'ने पहिल्या दिवशी ६० लाख रुपये कमावले आहेत.

# पाकिस्तान क्रिकेट बोर्डात गोंधळ!

## पाकिस्तानने आफ्रिकेला पराभूत करत मालिकाही नावे केली

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाकिस्तान संघाने मोठा धमाका करत दक्षिण आफ्रिकेच्या घरच्या मैदानावरच त्यांचा लाजिरवाणा पराभव केला. पाकिस्तान अनेकदा नवख्या संघांसमोर टिकत नाही. पण आता त्याने घरच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेला पराभवाचा धक्का दिला आहे. पाकिस्तानी संघाने गुरुवारी रात्री उशिरा दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात यजमान आफ्रिकेचा ८१ धावांनी पराभव केला. त्यांचा हा सलग दुसरा विजय आहे. यासह पाकिस्तानने ३ सामन्यांच्या वनडे मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे.**





पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना केपटाऊनमध्ये खेळवला गेला. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. आफ्रिकन संघापेक्षा पाकिस्तानसाठी हा निर्णय योग्य ठरला. बाबर आझम, मोहम्मद रिझवान आणि कामरान गुलाम यांच्या खेळीमुळे त्यांनी ५० षटकांत ३२९ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेचा संघ ४३.१ षटकांत २४८ धावा करून सर्वबाद झाला.प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने ५३ धावांतच दोन्ही सलामीवीरांच्या विकेट्स गमावल्या. सैम अयुब २५ धावा करून बाद झाला तर अब्दुल्ला शफिकला खातेही उघडता आले नाही. मात्र यानंतर बाबर आझम (७४) आणि मोहम्मद रिझवान (८०) यांनी फक्त संघाचा डाव सावरला नाही तर उलट आपल्या संघाला मोठ्या धावसंख्येकडे नेले. कामरान गुलामने शेवटच्या षटकांमध्ये वेगवान फलंदाजी करत ३२ चेंडूत ६३ धावा केल्या.३३० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेच्या आघाडीच्या ६ फलंदाजांनी चांगली सुरुवात केली पण क्लासेन वगळता कोणीही मोठी खेळी करू शकले नाही. हेनरिक क्लासेनने ७४ चेंडूत ९७ धावा केल्या. संघाचा दुसरा सर्वाधिक धावा करणारा टोनी डी जॉर्जी होता, ज्याने ३४ धावांची खेळी केली.डेव्हिड मिलर २९ धावा करून बाद झाला. उर्वरित फलंदाजांपैकी एकाही फलंदाजाला २५ धावांचा पल्ला गाठता आला नाही. पाकिस्तानकडून शाहीन आफ्रिदी आणि नसीम शाह यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. आफ्रिदीने ४ आणि नसीम शाहने ३ विकेट घेतल्या. अबरार अहमदने २ विकेट घेत दक्षिण आफ्रिकेला नमवले.पाकिस्तान संघाने मोठा धमाका करत दक्षिण आफ्रिकेच्या घरच्या मैदानावरच त्यांचा लाजिरवाणा पराभव केला. पाकिस्तान अनेकदा नवख्या संघांसमोर टिकत नाही. पण आता त्याने घरच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेला पराभवाचा धक्का दिला आहे. पाकिस्तानी संघाने गुरुवारी रात्री उशिरा दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात यजमान आफ्रिकेचा ८१ धावांनी पराभव केला. त्यांचा हा सलग दुसरा विजय आहे. यासह पाकिस्तानने ३ सामन्यांच्या वनडे मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. सैम अयुब २५ धावा करून बाद झाला तर अब्दुल्ला शफिकला खातेही उघडता आले नाही. मात्र यानंतर बाबर आझम (७४) आणि मोहम्मद रिझवान (८०) यांनी फक्त संघाचा डाव सावरला नाही तर उलट आपल्या संघाला मोठ्या धावसंख्येकडे नेले. कामरान गुलामने शेवटच्या षटकांमध्ये वेगवान फलंदाजी करत ३२ चेंडूत ६३ धावा केल्या.३३० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेच्या आघाडीच्या ६ फलंदाजांनी चांगली सुरुवात केली पण क्लासेन वगळता कोणीही मोठी खेळी करू शकले नाही.हेनरिक क्लासेनने ७४ चेंडूत ९७ धावा केल्या. संघाचा दुसरा सर्वाधिक धावा करणारा टोनी डी जॉर्जी होता, ज्याने ३४ धावांची खेळी केली.डेव्हिड मिलर २९ धावा करून बाद झाला.

### कोणीही मोठी खेळी करू शकले नाही

उर्वरित फलंदाजांपैकी एकाही फलंदाजाला २५ धावांचा पल्ला गाठता आला नाही. पाकिस्तानकडून शाहीन आफ्रिदी आणि नसीम शाह यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. आफ्रिदीने ४ आणि नसीम शाहने ३ विकेट घेतल्या. ५० षटकांत ३२९ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेचा संघ ४३.१ षटकांत २४८ धावा करून सर्वबाद झाला.प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने ५३ धावांतच दोन्ही सलामीवीरांच्या विकेट्स गमावल्या. सैम अयुब २५ धावा करून बाद झाला तर अब्दुल्ला शफिकला खातेही उघडता आले नाही. मात्र यानंतर बाबर आझम (७४) आणि मोहम्मद रिझवान (८०) यांनी फक्त संघाचा डाव सावरला नाही तर उलट आपल्या संघाला मोठ्या धावसंख्येकडे नेले. कामरान गुलामने शेवटच्या षटकांमध्ये वेगवान फलंदाजी करत ३२ चेंडूत ६३ धावा केल्या.३३० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेच्या आघाडीच्या ६ फलंदाजांनी चांगली सुरुवात केली पण क्लासेन वगळता कोणीही मोठी खेळी करू शकले नाही.

# पृथ्वीच स्वत:चा सर्वांत मोठा शत्रू!

## मुंबई क्रिकेट संघटनेच्या पदाधिकाऱ्याकडून बोचरी टीका

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विजय हजारे करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेसाठी मुंबई संघातून वगळण्यात आल्यानंतर सलामीवीर पृथ्वी शॉ याने नाराजी व्यक्त केली होती. मात्र, पृथ्वीने इतरांवर टीका करण्यापेक्षा आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. तोच स्वत:चा सर्वांत मोठा शत्रू आहे, अशी बोचरी टीका मुंबई क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) पदाधिकाऱ्याकडून करण्यात आली.**



काही दिवसांपूर्वीच झालेल्या सय्यद मुश्ताक अली ट्वेन्टी-२० स्पर्धेत मुंबईने जेतेपद पटकावले होते. या स्पर्धेत पृथ्वीने अनेकदा चांगली सुरुवात केली, पण त्याला मोठी खेळी करता आली नाही. त्यानंतर शनिवारपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे एकदिवसीय स्पर्धेसाठी पृथ्वीला मुंबईच्या १६ सदस्यीय संघात स्थान मिळाले नाही. सलामीवीराच्या स्थानासाठी अंगक्रिश रघुवंशी, आयुष म्हात्रे आणि जय बिस्ता यांना पसंती देण्यात आली. मुंबई संघातून वगळण्यात आल्यानंतर पृथ्वीने समाजमाध्यमांवर नाराजी व्यक्त करताना 'देवा, आणखी किती परीक्षा पाहणार आहेस,' असे लिहिले होते. तसेच त्याने देशांतर्गत एकदिवसीय क्रिकेटमधील आपली कामगिरी अधोरेखित करताना 'मी आणखी काय केले पाहिजे?' असा प्रश्न उपस्थित केला होता.याबाबत विचारले असता 'एमसीए'मधील वरिष्ठ पदाधिकाऱ्याने पृथ्वीने अधिक शिस्त पाळून तंदुरुस्तीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे म्हटले. "मुश्ताक अली स्पर्धेत आम्ही जणू १० क्षेत्ररक्षकांसह खेळत होतो. मैदानावर आम्हाला पृथ्वीला लपवावे लागत होते.

### वरिष्ठ खेळाडूही तक्रार करू लागले

फलंदाजीतही शरीरापासून दूर असलेला चेंडू मारताना त्याला अडचण येत असल्याचे स्पष्ट दिसून येत होते. त्याची तंदुरुस्ती, शिस्त आणि वर्तणूक फार वाईट आहे. आम्ही वेगवेगळ्या खेळाडूंना वेगवेगळा नियम लावू शकत नाही. त्याने इतरांचा स्तर गाठणे आवश्यक आहे," असे 'एमसीए'च्या पदाधिकाऱ्याने स्पष्ट केले.संघातील वरिष्ठ खेळाडूही आता पृथ्वीबाबत तक्रार करू लागले आहेत," असेही या पदाधिकाऱ्याने सांगितले. मुश्ताक अली स्पर्धेदरम्यान पृथ्वी अनेकदा रात्रभर पार्टी करायचा आणि सकाळी सहा वाजता हॉटेलमध्ये परत यायचा.